# क्रीडा विभाग
## वार्षिक अहवाल
## सत्र २०१८–१९

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रात सहभाग असावा व त्याद्वारे त्यांचे क्रीडानैपुण्य, क्रीडाभिरूची वाढावी यासाठी त्यादिशेने मैदानाची व्यवस्था करण्यात आली. सत्र २०१८–१९ मध्ये महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. यामध्ये छगन भुरे बी.ए. भाग प्रथम या विद्यार्थ्याने विद्यापीठस्तरीय ॲथ्लेटिक्स ११० मिटर हर्डल मध्ये सिल्वर मेडल व ४०० मिटर हर्डल मध्ये सिल्वर मेडल पटकाविला. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला त्यांची कामगिरी विद्यापीठ मैदानावर समाधानकारक होती. खेळात सहभाग वाढावा त्यादृष्टीने, क्रीडाविभाग प्रयत्नशील आहे.

महाविद्यालयात विशेष म्हणजे क्रीडा दिवसाअंतर्गत संपूर्ण दिवसभर महाविद्यालयात खेळाचे आयोजन करण्यात आले. यात कबडड्ी (मुले–मुली), खो–खो (मुले–मुली), व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, १०० मिटर दौड, गोळाफेक, लांबउडी तसेच मुलींसाठी संगीत खुर्ची, चमचागोळी इ. खेळांचे आयोजन करण्यात आले. शेवटी बक्षीस वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महाविद्यालयीन स्पर्धेकरीता विविध खेळात, स्पर्धेत हिरीरिने सहभाग नोंदविला जातो. क्रीडानैपुंण्याकरीता, विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धीक विकासाकरिता विविध मार्गदर्शक उपक्रम व प्रत्यक्ष प्रयोगक्षम खेळाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच विद्यापीठस्तरावर सुद्धा महाविद्यालयातील कबडड्ीसंघ झोन फायनल मध्ये पोहचला.




सत्र २०१८–१९ मध्ये छगण भुरे याला ४०० तसेच ११० मिटर हर्डलमध्ये सिल्वर मेडल प्राप्त केले.



महाविद्यालयीन मुलींची कबड्डी स्पर्धा



महाविद्यालयीन मुलांची कबड्डी स्पर्धा

Scanned with OKEN Scanner